२२

## श्रीदामोदराष्टकम्

(श्रीसत्यव्रत मुनी कृत)

नमामीश्वरं सच्चिदानंदरूपं
लसत्कुण्डलं गोकुले भ्राजमानम् ।
यशोदाभियोलूखलाद्धावमानं
परामृष्टमत्यं ततो द्रुत्य गोप्या ॥१॥

रुदन्तं मुहुर्नेत्रयुग्मं मृजन्तं
कराम्भोज-युग्मेन सातङ्कनेत्रम् ।
मुहुःश्वास कम्प-त्रिरेखाङ्ककण्ठ
स्थित ग्रैव-दामोदरं भक्तिबद्धम् ॥२॥

इतीदृक् स्वलीलाभिरानंद कुण्डे
स्वघोषं निमज्जन्तमाख्यापयन्तम् ।
तदीयेशितज्ञेषु भक्तैर्जितत्वं
पुनः प्रेमतस्तं शतावृत्ति वन्दे ॥३॥

वरं देव ! मोक्षं न मोक्षावधिं वा
न चान्यं वृणेऽहं वरेशादपीह ।।।
इदं ते वपुर्नाथ गोपाल बालं
सदा मे मनस्याविरस्तां किमन्यैः ॥४॥

इदं ते मुखाम्भोजमत्यन्तनीलै-
र्वृतं कुन्तलैः स्निग्ध-रक्तैश्च गोप्या ।
मुहुश्चुम्बितं बिम्बरक्ताधरं मे
मनस्याविरस्तामलं लक्षलाभैः ॥५॥

नमो देव दामोदरानन्त विष्णो
प्रसीद प्रभो दुःख जलाब्धिमग्नम् ।
कृपादृष्टि-वृष्ट्यातिदीनं बतानु
गृहाणेश मामज्ञमेध्यक्षिदृश्यः ॥६॥

कुबेरात्मजौ बद्धमूर्त्यैव यद्वत्
त्वयामोचितौ भक्तिभाजौकृतौ च ।
तथा प्रेमभक्तिं स्वकां मे प्रयच्छ
न मोक्षे गृहो मेऽस्ति दामोदरेह ॥७॥

नमस्तेऽस्तु दाम्ने स्फुरद्दीप्तिधाम्ने
त्वदीयोदरायाथ विश्वस्य धाम्ने ।
नमो राधिकायै त्वदीय-प्रियायै
नमो अनंत लीलाय देवाय तुभ्यम् ॥८॥

१. जे सच्चिदानंद-स्वरुप आहेत, ज्यांच्या कानांत सुंदर मकर-कुण्डल डोलत आहेत, गोकुळ नामक दिव्य धामात ज्यांचे वास्तव्य अतिशय शोभायमान आहे, जे(ज्या मडक्यात यशोदा माता ताक घुसळत होती ते मडके फोडल्यामुळे आणि शिक्यावरील लोणी चोरल्यामुळे) यशोदा मातेच्या भयाने पळून जात आहेत; परंतु माता यशोदेने त्यांना अधिक वेगाने धावत पकडले – अशा सर्वेश्वर भगवान श्रीदामोदरांना मी वंदन करतो.

२. (मातेच्या हातातील छडी पाहून) ते रुदन करू लागले आणि वारंवार आपल्या करकमळांनी डोळे पुसू लागले. त्यांचे नेत्र भयाने ओतप्रोत दिसत आहेत, श्वासाचा वेग अधिक वाढल्याने त्यांच्या शंखासमान त्रिरेखायुक्त कण्ठावरील मोत्यांचा हार कंपित होत आहे. अशा भगवान श्रीदामोदरांना, ज्यांचे उदर दोरीने नसून मातेच्या शुद्ध वात्सल्य प्रेमाने बांधले गेले आहे, मी वंदन करतो.

३. अशा प्रकारच्या बाल-लीलांनी ते गोकुळ-वासियांना परम आनंद प्रदान करीत आहेत. भगवंतांची महानता त्यांचे ऐश्वर्य आणि ज्ञान जाणून, आदर आणि ऐश्वर्य विरहित भावाने त्यांच्यावर प्रगाढ प्रेम करणारे भक्तच त्यांना जिंकू शकतात.

मी पुन: भगवान श्रीदामोदरांना अत्यंत भावपूर्ण शत: शत: प्रणाम करतो.

४. "हे भगवान! तुम्ही सर्व वरदान प्रदान करण्यास समर्थ आहात, तरीही मी तुमच्याकडे मुक्तीची आशा करीत नाही किंवा निरंतर वैकुंठवासाची वा इतर कोणतीही इच्छा करीत नाही. मी केवळ एकच प्रार्थना करतो की, तुमच्या बाललीला सदैव माझ्या अंत:करणात वास करोत. हे भगवंता! आपले परमात्मा स्वरूपही जाणण्याची माझी इच्छा नाही तर वृंदावनातील आपले बाल-गोपाळ रूप सदैव माझ्या हृदयात प्रकट राहो."

५. हे भगवन! यशोदा मातेद्वारा पुन: पुन: चुंबित, कोमल केशांनी घेरलेले, काहीसा लालिमायुक्त आपले नीलवर्ण मुखकमळ, बिम्बफळासमान रक्तवर्ण आपले अधर सदैव माझ्या हृदयी विराजमान राहो; अन्य लाखों लाभांचा माझ्यासाठी काहीच उपयोग नाही.

६. हे भगवन! मी आपणाला नमन करतो. हे दामोदर! हे अनंत! हे विष्णो! हे प्रभो! कृपया माझ्यावर प्रसन्न व्हा. आपल्या कृपादृष्टीचा वर्षाव करून, सांसारिक दु:खसागरात बुडालेल्या या दीन-हीन अज्ञानी मूर्खाचा उद्धार करा आणि माझ्या नेत्रांना आपले दर्शन द्या.

७. हे दामोदर! दोरीने ऊखळाला बांधलेल्या स्वरूपात ज्याप्रकारे कुबेराचे दोन पुत्र – मणिग्रीव आणि नलकुबेर यांना नारदमुनींच्या शापातून आपण मुक्त केले आणि त्यांना महान भक्त बनविले, त्याप्रकारे कृपया मला देखील आपली प्रेमभक्ती प्रदान करा. मी केवळ हीच इच्छा करतो, अन्य कोणत्याही मुक्तीची मला इच्छा नाही.

८. हे दामोदर! मी सर्वप्रथम त्या तेजोमय दामाला (दोरी) प्रणाम करतो. नंतर संपूर्ण विश्वाचे आधार स्वरूप असलेल्या आपल्या उदराला नमस्कार करतो. आपली प्रियतमा राधाराणीच्या चरणांना नमन करतो, आणि अनंत लीलामय स्वरूप आपणाला सकळ नमस्कार करतो.